जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**प्रेसनोट क्रमांक - २५६ दिनांक - ०७/०६/२०२४**

गुन्हे शाखा,पुणे शहर

# ई सिगारेट. वेब व तंबाखुजन्य फ्लेवर विक्रेते यांच्यावर छापा कारवाई

दिनांक ०७/०६/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त, श्री अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, श्री प्रविण पवार, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. शैलेश बलकवडे यांनी पुणे शहरातील ई सिगारेट व वेब याची विक्री करणारे यांची माहिती काढुन त्यांचेवर कारवाई करणे बाबतचे आदेश दिले होते.

त्याप्रमाणे मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. अमोल झेंडे, मा. श्री सुनिल तांबे, सहा पो आयुक्त, गुन्हे १,व मा. श्री. सतिश गोवेकर, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे २ यांचे मार्गदर्शना खाली पुणे शहर गुन्हे शाखे कडील सर्व युनिटचे अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार करुन दिनांक ०७/०६/२०२४ रोजी दिवसभर विशेष अभियान राबवुन पुणे शहरामध्ये ई सिगारेट, वेब व तंबाखुजन्य फ्लेवर यांची विक्री करणारे **एकुण १८** वेगवेगळया ठिकाणी छापा कारवाई करुन **एकुण २१** आरोपी यांना ताब्यात घेऊन त्याचेकडुन **एकुण १०,६७,५९४/-** रक्कमेची ई सिगारेट, वेब तसेच तंबाखुजन्य फ्लेवर जप्त करण्यात आले असुन सदर आरोपी यांचे विरुध्द सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम- २०१८ चे कलम ७ (२), २० (२) प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. सदर छापा कारवाई मध्ये सातत्य ठेवुन ई सिगारेट, वेब, तंबाखुजन्य फ्लेवर यांची विक्रीकरणारे यांचे समुळ उच्चाटण करण्यात येणार आहे.